# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांकः- ०५/०७/२०१८

## मुंबई -आग्रा महामार्गावर लुटमार करणारे टोळीतील गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

गतवर्षात माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये इगतपुरी आठचाळ परिसरातील रहिवासी श्री. अभिजित देहाडे यांना अज्ञात ४ ते ५ आरोपीतांनी मुंबई आग्रा महामार्गावर तळेगाव शिवारात मध्यरात्रीचे सुमारास मारहाण करून तिक्ष्ण हत्याराने मांडीवर गंभीर दुखापत करून त्यांचेकडील सॅमसंग एस ७ मोबाईल फोन व सोन्याची चैन जबरीने लुटमार करून नेलेबाबत इगतपुरी पोलीस ठाणेस I गुरनं १२०/२०१७ भादवि कलम ३९७,३२४ प्रमाणे गुन्हा दाखल होता. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे आदेशान्वये जिल्हयातील मालाविरुध्दचे नाउघड गुन्हयांतील सराईत गुन्हेगारांचा मागमुस काढुन गुन्हेगारीला प्रतिबंध करणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची धडक कारवाई चालु आहे. **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी जिल्हयातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेवुन त्यांचे सध्याचे ठावठिकाण व हालचालींबाबत सविस्तर माहिती घेणेबाबत स्थागुशाचे पथकास सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार दिनांक ०४ जुले २०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी वरील गुन्हयाचे समांतर तपासात सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी नाशिक शहर व इगतपुरी तालुक्यात मुंबई आग्रा महामार्गावर गस्त घालत असतांना, पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार सदर गुन्हा करणारे गुन्हेगार मालधक्का रोड, देवळाली, नाशिकरोड परिसरात वास्तव्यास असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने मालधक्का रोड, देवळाली परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) समाधान वसंत भोसले, वय ३०, रा.गुलाबवाडी, मालधक्का, नाशिकरोड हल्ली खुंटवली, अंबरनाथ, ता.कल्याण, जि.ठाणे** यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जात एक सॅमसंग कंपनीचा एस-७ मोबाईल मिळुन आला. सदर मोबाईल फोन बाबत विचारपुस करता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने त्यास पोलीसी खाक्या दाखविताच सदर मोबाईल फोन त्याचा साथीदार नामे २) राज वसंत चव्हाण, रा. धाररोड प्रताप महाविद्यालय जवळ, अमळनेर, जि.जळगाव, व युवती नामे ३) राबीया दिलेरखॉं पटवे, रा. टाकी फाईल, अंमळनेर, जि.जळगाव यांनी दिला असल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले इसमाकडे अधिक चौकशी केली असता, त्याचे वरील साथीदार नामे राज चव्हाण, राबीया पटवे व त्यांचे इतर ०३ साथीदारांसह गतवर्षी माहे नोव्हेंबर मध्ये मुंबई आग्रा महामार्गावर इगतपुरी गावचे पुढे हॉटेल अपना ढाबाचे परिसरात एका इसमास मारहाण करून त्याचेकडील मोबाईल फोन व सोन्याची चैन जबरीने लुटमार केलेली असल्याचे सांगितले आहे.

सदर आरोपी नामे राज चव्हाण व युवती नामे राबीया पटवे हे दोघे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर अमळनेर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं.५८/२०१८ भादवि कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात ते मध्यवर्ती कारागृह जि.जळगाव येथे न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. तसेच त्यांचे अमळनेर व बदलापुर येथील इतर ०३ साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन त्यांचेकडुन जबरी लुटमारीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि राम कर्पे, पोउनि स्वप्निल नाईक, सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा बंडु ठाकरे, शिवाजी जुंदरे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ, चापोना रमेश काकडे यांचे पथकाने इगतपुरी पो.स्टे.कडील जबरी लुटमारीचा गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.